**remote kinsman,** दूरचा भाऊबंद (पु.)
**remote lineal discendant,** दूरचा रेषीय वंशज (पु.)
**remoter issue,** दूरतर संतान (न.) [T. P. Act-s. 17(2)(ii)]
**removal,** *n.* १. (Change of place ; transference) स्थानांतरण (न.), हलवणे (न.), २. दूर करणे (न.), दूरीकरण (न.), काढून टाकणे (न.) ३. नाहीसे करणे, निरसन करणे
**removal of causes,** कज्जे काढून टाकणे (न.)
**removal of doubts,** शंका निरसन (न.) [Hin. Suc. Act-s. 4(2)]
**remove,** *v.t.* १. हलवणे २. दूर करणे, काढून टाकणे ३. निरसन करणे
**remuneration,** *n.* पारिश्रमिक (न.) [T. P. Act-s. 69A(6)]
**remunerative,** *adj.* १. (yielding adequate reward) मोबदला देणारा २. (profitable) किफायतशीर, लाभकारी
**render an account,** हिशेब देणे
**render service,** सेवा देणे
**render unmerchantable,** अविक्रेय बनवणे [Sale of Gds. Act-s. 17(2)(c)]
**rendition of accounts,** हिशेब देणे (न.)
**renew,** *v. t. & i.* नवीकरण करणे, नूतनीकरण करणे
**renewable,** *adj.* नवीकरणयोग्य, नूतनीकरणयोग्य
**renewal,** *n.* नवीकरण (न.), नूतनीकरण (न.)
**renounce,** *v.t.* सोडून देणे, त्याग करणे
**renounce the world,** प्रपंचाचा त्याग करणे [Hin. Mar. Act-s. 13(1)(vi)]
**rent,** *n.* १. (in case of houses etc.) भाडे (न.) २. (in case of lands) खंड (पु.) ३. भाटक (न.)
**rentable,** *adj.* भाडेयोग्य
**rental,** *n.* (a sum payable as rent) भाडे (न.)
*adj.* भाडे–, भाड्याचे
**rental value,** भाडेमूल्य (न.)
**rent-charge,** *n.* (a burden imposed on and issuing out of lands) खंडभार (पु.)
**rent decree,** भाडे हुकूमनामा (पु.)
**rents and profits,** भाडे व फायदा [T. P. Act-s. 55(4)(a)]
**rent suit,** भाटक फायदा (पु.)
**renunciation,** *n.* त्याग (पु.), त्याग करणे (न.) [Disso. of Mar. Act-long title]
**reorganisation,** *n.* पुनर्रचना (स्त्री.), पुनःसंघटन (न.)
**repairs,** *n.pl.* दुरुस्त्या (स्त्री.अ.व.) [T. P. Act-s. 108(f)]
**reparation,** *n.* हानिपूर्ति (स्त्री.)
**repay,** *v. t. & i.* फेड करणे, परतफेड करणे
**repayable,** *adj.* परतफेडयोग्य, परत फेडण्याजोगा, परत फेडावयाचा
**repayment,** *n.* परतफेड (स्त्री.)
**repeal,** *v.t.* निरसन करणे, निरसित करणे
*n.* निरसन (न.)
**repealed Act,** निरसित अधिनियम (पु.)
**repeals and savings,** निरसने आणि व्यावृत्ती (अ. व.)
**repetition,** *n.* १. पुनरावृत्ति (स्त्री.) २. पुनरुक्ति (स्त्री.)
**replace,** *v.t.* १. –ची जागा घेणे २. पुनः स्थापित करणे ३. –च्या जागी ठेवणे, –च्या जागी आणणे
**replacement,** *n.* पुनःस्थापन (न.)
**replacement licence,** पुनःस्थापन अनुज्ञप्ति (स्त्री.)
**replevin,** *n.* (restoration or recovery of distrained goods on security given for submission to trial and judgment—Oxford) प्रत्याप्ति (स्त्री.)
**replevin bond,** प्रत्याप्ति बंधपत्र (न.)
**replication,** *n.* (in pleadings, the plaintiff's answer or reply to the defendant's plea or answer) वादीचे प्रत्युत्तर (न.)
**reply,** *v. t. & i.* उत्तर देणे
*n.* उत्तर (न.)
**report,** *v t. & i.* १. (to give a formal or official account or statement of) प्रतिवेदन देणे २. (to give esp. a called for account) अहवाल देणे, प्रतिवृत्त देणे ३. (to tell or bring back, as news) बातमी देणे, वृत्त देणे, कळवणे, खबर देणे ४. (to make a complaint against somebody to a superior) तक्रार करणे ५. (as, for duty) (कामावर) हजर होणे
*n.* १. प्रतिवेदन (न.), अहवाल (पु.) २. (बंदुकीचा) बार (पु.)
**represent,** *v.t.* १. अभिवेदन करणे [T. P. Act-s. 43] २. प्रतिनिधित्व करणे ३. प्रतिरूपण करणे
**representation,** *n.* १. अभिवेदन (न.) २. प्रतिनिधित्व (न.) [Ind. Suc. Act-s. 226] ३. प्रतिरूपण (न.)
**representative,** *n.* प्रतिनिधि (सा.)
*adj.* 1. (serving as a class or group) प्रातिनिधिक 2. (serving to portray or show) दर्शक
**representative capacity,** *n.* प्रातिनिधिक नाते (न.) [C. P. C.-Order VII-Rule 9(2)]
**representative character,** प्रतिनिधीची भूमिका (स्त्री.) [Ind. Evi. Act-s. 18]
**representative in interest,** हितसंबंध–प्रतिनिधि (सा.) [Ind. Evi. Act-s. 21]
**representative title,** प्रातिनिधिक सत्वाधिकार (पु.) [Ind. Suc. Act-s. 214-m.n.]
**represent the estate,** संपदेचे प्रतिनिधित्व करणे [C. P. C.-s. 2(11)]
**repress,** *v.t.* दडपणे, दडपशाही करणे
**reprieve,** *v.t.* (suspend the execution of a criminal sentence) शिक्षा तहकूब करणे, शिक्षा प्रलंबित करणे
*n.* शिक्षा तहकुबी (स्त्री.), शिक्षा प्रलंबन (न.) [Const.-Art.-72(1)]
**reprimand,** *v.t.* १. ताशेरे झाडणे २. खरडपट्टी काढणे
*n.* १. ताशेरा (पु.) २. खरडपट्टी (स्त्री.)
**reproach,** *v.t.* दूषण देणे, निर्भर्त्सना करणे
*n.* दूषण (न.)
**reproof,** *n.* ठपका (पु.)
**reprove,** *v.t.* १. ठपका ठेवणे २. हजेरी घेणे
**republic,** *n.* गणराज्य (न.), प्रजासत्ताक (न.)
**republic of India,** भारतीय गणराज्य (न.), भारतीय प्रजासत्ताक (न.)
**repudiate,** *v.t.* (to refuse to accept or to acknowledge) इन्कारणे, प्रत्यादिष्ट करणे [Ind. Con. Act-s. 215]
**repudiate a marriage,** विवाह इन्कारणे [Disso. of Mar. Act-s. 2(vii)]
**repudiate a suit,** दावा प्रत्यादिष्ट करणे [C. P. C.-Order XXXII-Rule 13(1)]